रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
वर्ष १८ ◆ अंक २
www.ramprahar.com
शनिवार १९ जुलै २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

‘आरोग्य सेवा योजनेच्या दरांमध्ये सुधारणा करणार’/२
रानोमाळी फुले बहरली, निसर्गप्रेमी आनंदले!/५
भाजप जनता दरबार आयोजित करणार -पंडित पाटील/७

## विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचे सूप वाजले



**मुंबई :** महाराष्ट्र राज्य विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचा समारोप शुक्रवारी (दि. १८) झाला. आता पुढील हिवाळी अधिवेशनात ८ डिसेंबरपासून नागपुरात सुरू होणार असून हे सत्र दोन दोन आठवड्यांहून अधिक काळ चालण्याची शक्यता आहे. पावसाळी अधिवेशनाचे सूप वाजल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत आम्ही १६ विधेयके पास केली असल्याचे सांगितले. राज्यात सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडत आहे. ९३ टक्के पाऊस आतापर्यंत पडला आहे. धरणात चांगला साठा आहे. खरिपाचा हंगाम यंदा चांगला असेल. पावसाची कामगिरी दमदार आहे तशीच आमच्या सरकारचीदेखील दमदार आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले. विरोधकांनी कोणतेही पुरावे न देता आरोप केले. आरोप करायचे आणि त्यातून बाजूला व्हायचे ही विरोधकांची भूमिका होती, अशी टीका या वेळी मुख्यमंत्र्यांनी केली.

# सभागृहाची प्रतिष्ठा सर्वांनी जपावी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**

विधान भवन परिसरात काल जे काही झाले, त्यामुळे संपूर्ण सभागृहाच्या प्रतिष्ठेला गालबोट लागले आहे. हे काही बरे नाही. या सभागृहाची प्रतिष्ठा सर्वांनी जपली पाहिजे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. विधीमंडळ मेन पोर्च येथे दोन सदस्यांच्या अभ्यागतांदरम्यान झालेल्या मारहाणीसंदर्भात ते बोलत होते.

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी विधान भवन परिसरात झालेल्या राड्याप्रकरणी आमदार जितेंद्र आव्हाड आणि आमदार गोपीचंद पडळकर यांना सभागृहात खेद व्यक्त करण्यास सांगितले. त्यानुसार पडळकर उभे राहिले व त्यांनी खेद व्यक्त केला. यानंतर आमदार जितेंद्र आव्हाड यांनी त्यांना आलेल्या धमकीचा उल्लेख केला. त्यावर सत्ताधारी बाकावरील आमदारांनी मूळ विषयावर बोलण्यास सांगितले, तर विरोधी बाकांवरील



आमदार म्हणाले, आव्हाडांना बोलू द्या. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

मुख्यमंत्री म्हणाले, जितेंद्र आव्हाड यांनी त्यांना आलेल्या धमकीचा उल्लेख केला. तो उल्लेख करण्यास आमची मनाई नाही, परंतु सध्या जो विषय चालू आहे त्यावर बोलले पाहिजे. विधानसभा अध्यक्षांनी एखादा प्रस्ताव मांडला असेल तर त्यावर चर्चा करायला हवी. तुम्ही लोक (विरोधक) कधीतरी राजकारणाच्या पलीकडे जाणार आहात की नाही? जयंत पाटीलजी, तुम्ही वरिष्ठ आहात. तुम्ही तरी या गोष्टीचा विचार केला पाहिजे.

आपण ज्या प्रतिष्ठेबद्दल बोलत आहोत ती काही एका व्यक्तीची नाही, तर या सभागृहाची प्रतिष्ठा आहे आणि ती सर्वांनी जपली पाहिजे. आज बाहेर लोकांच्या शिव्या पडत आहेत. हे आपण गांभीर्याने घेतले पाहिजे, असेही मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

### अधिवेशन काळात विधीमंडळ परिसरात अभ्यागतांना प्रवेश बंदी

**मुंबई** : विधीमंडळ परिसरात अधिवेशन काळामध्ये विधीमंडळ सदस्य, त्यांचे स्वीय सहाय्यक आणि शासकीय कर्मचारी यांनाच प्रवेश असेल. अभ्यागतांना प्रवेश देण्यात येणार नाही, असे विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी स्पष्ट केले आहे. ते पुढे म्हणाले की, विधानमंडळाच्या उच्च परंपरांचे पालन करणे ही आपली घटनात्मक जबाबदारी आहे. आपले उत्तरदायित्व संविधानाशी आहे. विधानमंडळासह सर्व संस्था संविधानातून निर्माण झाल्या आहेत. विधानमंडळाचे सदस्य म्हणून शपथ घेताना कायद्याद्वारे स्थापित झालेल्या संविधानाबद्दल श्रद्धा, निष्ठा बाळगण्याची शपथ घेतो. कर्तव्य निष्ठापूर्वक पार पाडण्याची शपथ घेतो. त्याचे आपण सर्वांनी गांभीयपूर्वक पालन करावे. घडलेल्या घटनेची चौकशी विधीमंडळाच्या मुख्य सुरक्षा अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात झाली असून त्यांचा अहवाल प्राप्त झाला आहे, असे विधानसभा अध्यक्षांनी सांगितले.





## ‘रामप्रहर’चा वर्धापन दिन उत्साहात साजरा




**पनवेल : दै. रामप्रहरचा १७वा वर्धापन दिन शुक्रवारी उत्साहात साजरा झाला. यानिमित्त आयोजित श्री सत्यनारायण पुजेचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी दर्शन घेऊन शुभेच्छा दिल्या. या वेळी ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, मुद्रक-प्रकाशक कृष्णाशेठ ठाकूर, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पडघेचे माजी सरपंच कृष्णा पाटील, मल्हार नेटवर्क प्रा.लि.चे संचालक स्वप्नील ठाकूर, मुख्य संपादक देवदास मटाले, व्यवस्थापक दादाराम मिसाळ, वृत्तसंपादक समाधान पाटील, उपसंपादक तन्वी पवार, नितीन देशमुख, आर्टिस्ट अरुण चवरकर, शशिकांत बारसिंग, वितरण विभागाचे महेश काळे, कार्यालयीन सहाय्यक करण वाहुळकर उपस्थित होते.**

*(छाया : विकास म्हात्रे, सुबोध ठाकूर; अधिक छायाचित्रे पान ३, ६, ८ वर..)*

## मुंबई लोकलचे डबे मेट्रोसारखे एसी होणार

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईकरांची लाईफलाईन असलेल्या लोकल प्रवाशांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आनंदवार्ता दिली आहे. आहे त्याच तिकीटदरात लोकल प्रवाशांना मेट्रोसारख्या एसी डब्यातून प्रवास करता येईल आणि त्याकरता तिकिटात एक रुपयाचीही वाढ केली जाणार नाही, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.



**तिकिटात कोणतीही वाढ नाही!**

मुख्यमंत्री म्हणाले, काही दिवसांपूर्वी मुंब्रा इथे मोठी दुर्घटना झाली. उपनगरीय लोकल सेवेला दरवाजे नसल्यामुळे अपघात होत आहेत. अतिशय वाईट परिस्थितीत लोक प्रवास करतात. आज दोन क्लास तयार केले आहेत. मेट्रो पूर्णपणे एसी आहे. दरवाजे बंद होतात. एसी असल्यामुळे चांगला प्रवास होत आहे. दुसरीकडे लोकल रेल्वे आहे. तिथे लोक दाटीवाटीत प्रवास करतात. दरवाजे नसल्यामुळे अपघात होतात. पंतप्रधान आणि रेल्वेमंत्र्यांकडे मागणी केली की, मेट्रोसारखे कोचेस हे लोकल रेल्वेला दिले पाहिजेत, जे एसी असतील आणि दरवाजे बंद होतील. हे कोचेस लावले तरी तिकिटात एक रुपयाचीदेखील वाढ केली जाणार नाही अशी मागणी केली आहे. लवकरच मुंबईत येऊन ते घोषणा करतील.

## निजामपूर ग्रामपंचायतीचे नाव आता रायगडवाडी

**मुंबई : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची राजधानी असलेला राजगड किल्ला ज्या निजामपूर ग्रामपंचायतीच्या हद्दीत येतो त्या ग्रामपंचायतीचे नाव बदलण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्यातील सत्ताधारी महायुती सरकारने घेतला आहे. आता निजामपूर ग्रामपंचायतीचे नाव बदलून तिला रायगडवाडी ग्रामपंचायत असे दिले जाईल, अशी घोषणा राज्याचे ग्रामविकासमंत्री जयकुमार रावल यांनी केली.

भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर आणि आमदार राहुल कूल यांनी ही मागणी केली होती तसेच या ग्रामपंचायतीचे नाव बदलण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थांकडूनही अनेक वर्षांपासून करण्यात येत होती. दरम्यान, राज्य सरकारने महाराष्ट्रातील आणखी एका शहराचे नाव बदलण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर शहर आता ईश्वरपूर या नावाने ओळखले जाणार आहे.

## निवडक

### छत्तीसगडमध्ये चकमकीत सहा नक्षलवादी ठार

**नारायणपूर** : छत्तीसगडमधील नारायणपूर जिल्ह्यात अबुझमाडच्या जंगलात शुक्रवारी (दि. १८) सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीत सहा नक्षलवादी ठार झाले. घटनास्थळाहून शस्त्रे, स्फोटके आणि दैनंदिन वापराच्या वस्तू जप्त करण्यात आल्या आहेत.

### घुसखोरांवर कारवाई केली जाणार -पंतप्रधान मोदी

**कोलकाता** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी (दि. १८) पश्चिम बंगालमधील दुर्गापूर येथील सभेत घुसखोरांना इशारा दिला. तृणमूल काँग्रेसचे सरकार घुसखोरांचे समर्थन करीत आहेत, पण जो या देशाचा नागरिक नाही त्यांच्यावर कारवाई होईल, असे पीएम म्हणाले.

### माजी मुख्यमंत्र्यांच्या मुलाला ईडीकडून अटक

**रायपूर** : ईडीने छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल यांचा मुलगा व उद्योगपती चैतन्य बघेल यांना शुक्रवारी (दि. १८) अटक केली. राज्याच्या दारू धोरणाशी संबंधित मनी लॉण्डरिंगप्रकरणी ही कारवाई करण्यात आली.



## पनवेल रेल्वेस्थानकावर ३५ कोटींचे ड्रग्स जप्त

### दोन प्रवासी ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

अमली पदार्थविरोधी विभागाने (एनसीबी) शुक्रवारी (दि. १८) सकाळी पनवेल रेल्वेस्थानकावर दोन प्रवाशांकडून सुमारे ३.५ किलो ड्रग्स जप्त केले. या ड्रग्जची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत जवळपास ३५ कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याचे सांगितले जात आहे.

ताब्यात घेण्यात आलेले आरोपी मंगला एक्स्प्रेसमधून प्रवास करीत होते. खाण्याच्या पुड्यामध्ये हे ड्रग्ज ठेवण्यात आले होते. गोपनीय माहितीनुसार कारवाई करण्यात आली. ताब्यात घेतलेल्या प्रवाशांचा कोणत्या टोळीशी याचा संबंध आहे तसेच कोणाला अटक झाली आहे का याबाबत अद्याप अधिकृत माहिती मिळालेली नाही, पण या कारवाईमुळे ड्रग्ज रॅकेट उघड होण्याची शक्यता आहे. जप्त केलेले ड्रग्ज रेल्वे सुरक्षा दलाकडे देण्यात आले असून अधिक तपास सुरू आहे.

## गणेशोत्सवानिमित्त मध्य रेल्वेच्या २५० विशेष गाड्या

**मुंबई : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाला अवघे काही दिवस उरले आहेत. गावी जाण्यासाठी चाकरमान्यांनी तयारी सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर प्रवाशांच्या सोयीसाठी मध्य रेल्वे २५० गणपती विशेष गाड्या चालवणार आहे.

गणपती विशेष गाड्यांचे आरक्षण २४ जुलैपासून सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर व www.irctc.co.in या संकेतस्थळावर विशेष शुल्कासह सुरू होईल. अनारक्षित कोचसाठी तिकीट बुकिंग अनारक्षित तिकीट प्रणाली (UTS)द्वारे सुपरफास्ट मेल/एक्स्प्रेस गाड्यांसाठी लागू असलेल्या सामान्य शुल्कानुसार करता येईल. तपशीलवार थांब्यांची वेळ जाणून घेण्यासाठी www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या किंवा NTES ॲप डाऊनलोड करा.

## ‘सध्या आम्ही फक्त मराठीच्या मुद्द्यावर एकत्र’



**मुंबई** : मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे बंधू २० वर्षांनी एकत्र आल्याने राजकीय समीकरणे बदलणार का, अशी चर्चा सुरू झाली होती. आता उद्धव यांनी यावर विधान केले आहे. ते म्हणाले, आम्ही मराठीच्या विषयावर एका व्यासपीठावर आलो. पुढे मुद्दा येतो तो राजकारणाचा. आता कोणतीही निवडणूक जाहीर झालेली नाही. जेव्हा निवडणूक जाहीर होईल, त्या वेळी आम्ही चर्चा करू.

दुसरीकडे राज ठाकरे यांनी युतीबाबत कोणतीही स्पष्ट भूमिका घेतलेली नाही. त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना युतीच्या विषयावर सबुरीचा सल्ला दिला असल्याचे पहायला मिळत आहे. मनसेच्या शिबिरात त्यांनी, आम्ही मराठीसाठी एकत्र आलो होतो, तो विषय तेवढ्यापुरताच मर्यादित आहे, असे म्हटले होते. मीरा रोड येथे शुक्रवारी (दि. १८) झालेल्या सभेतही त्यांनी ‘उबाठा’बरोबरच्या युतीसंदर्भात काहीच भाष्य केले नाही.




## रायगडात २२० मासेमारी बोटींचे नवीन नोंदणीसाठी प्रस्ताव

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात २२० मासेमारी बोटींचे नवीन नोंदणीसाठी प्रस्ताव मत्स्य व्यवसाय विभागाकडे प्राप्त झाले होते. या महिन्याअखेरपर्यंत हे सर्व बोटींना नोंदणी प्रक्रिया पूर्ण होईल, अशी माहिती मस्त्यव्यवसाय विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

कोर्लई येथे आढळून आलेल्या कथित पाकिस्तानी बोटींच्या शोधमोहिमेदरम्यान जिल्ह्यात शेकडो बोटींची नोंदणी नसल्याची बाब पोलिसांच्या तपासात समोर आली होती. या पार्श्वभूमीवर मत्स्यव्यवसाय विभागाकडे विचारणा केली असता ही माहिती देण्यात आली. जिल्ह्यात नवीन मासेमारी नौका नोंदणीसाठी २२० अर्ज मत्स्यव्यवसाय विभागाकडे प्राप्त



झाले आहेत, ज्यात सहाय्यक मत्स्यव्यवसाय आयुक्त स्तरावर सध्या ९१ अर्जांचा, परवाना अधिकारी कार्यालय स्तरावर ६९ अर्जांचा, तर तर नौकामालकांच्या स्तरावर ६० अर्जांचा समावेश आहे. हे सर्व प्रस्ताव मागील दोन महिन्यातील आहेत. जुलै महिन्याच्या अखेरपर्यंत सर्व प्रस्ताव निकाली काढले जातील, असे सांगण्यात आले.

मासेमारी बोटींच्या नोंदणीची प्रक्रिया निरंतर सुरू असते. सर्व तांत्रिक बाबी आणि कागदपत्रांची पडताळणी केल्यावर नवीन बोटींची नोंदणी करून मासेमारी परवाना दिला जात असतो. विमा काढून या बोटी मासेमारीसाठी जातात. मत्स्यव्यवसाय विभागाकडे जिल्ह्यात सद्यस्थितीत पाच हजार ४१७ नोंदणीकृत मासेमारी यांत्रिक नौका आहेत. यात महिनाअखेरपर्यंत २२० नवीन नौकांची भर पडणे अपेक्षित आहे. रिअल क्राफ्ट प्रणालीने मासेमारी बोटींची नोंदणी केली जाते. त्यानुसार जिल्ह्यात नोंदणी केलेल्या यांत्रिक मासेमारी बोटींची संख्या सात हजार २७८ एवढी होती. यातील एक हजार ८६१ बोटींची नोंदणी रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे सद्यस्थितीत जिल्ह्यात पाच हजार ४१७ यांत्रिक नौका नोदणीकृत आहेत, असेही मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

## कर्जतमध्ये अल्पवयीन मुलीला गोळ्या देऊन गर्भपात

### आरोपी तरुण अटकेत

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जतमध्ये अल्पवयीन मुलीला प्रेमाच्या जाळ्यात अडकवून आरोपी तरुणाने तिच्यासोबत लैंगिक संबंध प्रस्थापित केले, मात्र पीडित मुलगी गर्भवती राहिल्याने आरोपीने गर्भपाताच्या तिला गोळ्या दिल्या. यामुळे या मुलीचा गर्भपात झाल्याची घटना उघडकीस आली आहे.

कर्जत तालुक्यातील मोठे वेणगाव चिंचेवाडी येथील राहणारा २३ वर्षीय आरोपी चेतन किसन वाघमारे याने गावातीलच अल्पवयीन मुलीला आपल्या प्रेमाच्या जाळ्यात अडकवले होते. या मुलीचा अज्ञानपणाचा फायदा घेत आरोपीने तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याने ती गर्भवती राहिली. हे समजताच आरोपीने गर्भपाताच्या दोन गोळ्या देऊन ११ जुलै रोजी मुलीचा गर्भपात घडवून आणला. यामुळे मुलीला जास्त प्रमाणात त्रास होऊन रक्तस्त्राव होत असल्याने उपचारासाठी प्रथम कर्जत उपजिल्हा रुग्णालयात आणि नंतर अधिक उपचारासाठी उल्हासनगर शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. हा फौजदारी गुन्हा असल्याचे लक्षात येताच याबाबत विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात माहिती देण्यात आल्याने हा गुन्हा कर्जत पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला.

दरम्यान, आरोपी चेतन वाघमारे याला कर्जत पोलिसांनी अटक केली असून त्याच्या विरोधात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी अधिक सुरू आहे.

# केंद्रीय आरोग्य सेवा योजनेच्या दरांमध्ये सुधारणा करणार -केंद्रीय मंत्री मांडविया

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्रीय आरोग्य सेवा योजनेच्या दरांमध्ये सुधारणा करण्याची बाब केंद्र सरकारच्या विचाराधीन असून लवकरच त्यात सुधारणा केली जाईल, अशी ग्वाही केंद्रीय श्रम व रोजगार मंत्री मनसुख मांडविया यांनी दिली. राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी बुधवारी नवी दिल्ली येथे केंद्रीय श्रम व रोजगार मंत्री मांडविया यांची वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळासह भेट घेतली.



या भेटीत महाराष्ट्रातील राज्य कामगार विमा योजना रुग्णालयांच्या सद्यस्थितीबाबत सविस्तर चर्चा झाली. राज्यातील कामगार रुग्णालयामध्ये दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचे शासनाचे धोरण असुन राज्यातील कामगार रुग्णालयासंबंधीत प्रलंबित प्रश्नांची तातडीने सोडवणूक व्हावी, अशी मागणी आरोग्यमंत्री आबिटकरांनी यावेळी केली.

राज्यात कामगार विमा सोसायटीची पंधरा रुग्णालये असुन योजनेची संलग्नित असलेल्या ४५० खाजगी रुग्णालये व १३४ सेवा दवाखान्याच्या माध्यमातून कामगार व सर्वसामान्य नागरिकांसाठी आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली जाते. राज्यात सद्यस्थितीत ४८ लाख ७० हजार ४६० विमाधारक कामगार असुन, कामगार व त्यांचे कुटुंबीय मिळून सुमारे दोन कोटी नागरिक विमा योजनेचा लाभ घेतात. केंद्रीय श्रम व रोजगार मंत्री यांच्या भेटीत उल्हासनगर, अंधेरी, कोल्हापूर येथील बांधकामांची सद्यस्थिती, विविध ठिकाणी सुरू असलेल्या रुग्णसेवा बाबतची चर्चा झाली.

कामगार व त्यांचे कुटूंबियांना गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा देण्यासाठी राज्याला अधिक निधी देण्याची विनंती आरोग्य मंत्री आबिटकर यांनी केली. सद्यस्थितीत २१,००० हजार रुपये मासिक उत्पन्न असलेल्या कामगारांना विमा योजनेचा लाभ घेता येतो. ही उत्पन्न मर्यादा ३०,०००हजार रुपये पर्यंत वाढवण्याची मागणी यावेळी केली. उत्पन्नाची मर्यादा वाढवल्यास विमाधारक कर्मचाऱ्यांची संख्याही वाढेल तसेच अनेक कामगारांना या योजनेचा लाभ घेता येईल, असेही मंत्री आबिटकर यांनी केंद्रीय मंत्र्यांना सांगितले.

केंद्रीय मंत्री मांडविया यांनी वरील सर्व प्रश्नांच्या सोडवणुकी बाबतीत सकारात्मक चर्चा केली. तसेच राज्याचे आरोग्य मंत्री यांचे समवेत मुंबईतील अंधेरी येथील ईएसआयएस रुग्णालयास संयुक्त भेट देऊन पाहणी करणार असल्याचे सांगितले आहे. राज्यातील सर्व ईएसआयसी रुग्णालयांबाबत एक सविस्तर आढावा बैठक आयोजित करण्याच्या सूचनाही केंद्रीय मंत्र्यांनी यावेळी दिल्या.

अंधेरी, कोल्हापूर आणि उल्हासनगर येथील ईएसआयसी रुग्णालयांची प्रलंबित कामे लवकरात लवकर पूर्ण करून ती कार्यान्वित करण्यासाठी ईएसआयसी महासंचालकांना सूचना देण्यात येतील, तसेच कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक येथील ईएसआयसी रुग्णालयाची श्रेणीवाढ करण्याबाबतही विचार केला जाईल, असे डॉ.मांडविया यांनी सांगितले.

या भेटीमुळे महाराष्ट्रातील ईएसआयसी आरोग्य सुविधांच्या सक्षमीकरणाला गती मिळेल आणि विमाधारक कर्मचाऱ्यांसाठी उत्तम आरोग्य सेवा उपलब्ध होतील, असे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी या भेटीबाबत सांगितले.

## किल्ल्यांच्या 'युनेस्को' नोंदीचा वावोशीत भाजपकडून जल्लोष



**खालापूर : रामप्रहर वृत्त**

संपूर्ण जनतेचे आराध्यदैवत असलेले छत्रपती शिवरायांनी निर्माण केलेल्या बारा गड किल्ल्यांची युनेस्कोने दखल घेत वारसा यादीत नोंद केली आहे.आणि त्यामुळे जगभरातील नागरिकांना छत्रपती शिवरायांचा इतिहास कळणार आहे. जगभरातून येणाऱ्या प्रत्येक पर्यटकाला त्यांच दर्शन घेता येणार आहे. यासाठी केंद्र सरकार, राज्यसरकार आणि विशेषकरून कमिटी प्रमुख आशिष शेलार यांनी युनेस्कोच्या कमिटीसोबत संपर्क करून हे यश मिळविले आहे. हिंदुस्थानच्या प्रत्येक नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे खालापूर तालुक्यातील वावोशी येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकासमोर भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला.

यावेळी छत्रपती शिवरायांच्या स्मारकाला पुष्पहार अर्पण करून आलेल्या प्रत्येक नागरिकांने दर्शन घेतले.तसेच फटाक्यांची आतशबाजी करीत एकमेकांना पेढे भरवीत आनंद साजरा केला.यामुळेच सर्वीकडे हा आनंद साजरा करण्यासाठी नागरिक एकत्र येऊन उत्सव साजरा करीत आहेत असे वक्तव्य केले.यावेळी जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल मोरे, तालुका सरचिटणीस रविंद्र पाटील, युवा मोर्चा विधानासभा अध्यक्ष प्रसाद पाटील,युवा मोर्चा अध्यक्ष नागेश पाटील,महिला मोर्चा अध्यक्ष सुजाता दळवी,वाहतूक सेल अध्यक्ष हरिभाऊ जाधव,उद्योग आघाडी अध्यक्ष रविंद्र मोरे,युवा नेते रोहिदास भाऊ पाटील,ग्रामपंचायत सदस्य संदीप मोरे,विभाग ध्यक्ष भरत महाडीक,माजी सरपंच राकेश जाधव आदी उपस्थित होते.

## अमरधाम स्मशानभूमी परिसरामध्ये वृक्षारोपण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका उद्यान विभाग, लायन्स क्लब ऑफ पनवेल, लायन्स क्लब ऑफ सरगम, लिओ क्लब ऑफ कळसेकर टेक्निकल कॅम्पस यांच्या संयुक्त विद्यमानाने नुकताच वृक्षारोपण कार्यक्रम अमरधाम स्मशानभूमी परिसरात घेण्यात आला.

या कार्यक्रमासाठी लायन्स क्लब ऑफ सरगमचे अध्यक्ष प्रेमेंद्र बहिरा, लायन्स क्लब ऑफ पनवेलच्या अध्यक्षा सुरभी पेंडसे, लायन्स क्लब डिस्ट्रिक्ट चेअरमन (पर्यावरण) मुर्तुझा अफसर, सदस्य अशोक गिल्डा, नंदकिशोर धोत्रे, नूतन धोत्रे, मंगला ठाकूर, प्रतिमा चौहान, संजय गोडसे, अल्केश शहा, स्वाती गोडसे, धवल शहा, अनिल परमार, महेंद्र लोहार उपस्थित असून लोकसहभागातून वृक्षारोपणाचे प्रमाण वाढवण्यासाठी सहाय्यक आयुक्त डॉ. रुपाली माने, विभागप्रमुख अनिल कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उद्यान पर्यवेक्षक सिद्धार्थ कांबळे, अशोक मुने व सहाय्यक उद्यान पर्यवेक्षक किरण गायकवाड, गजलक्ष्मी आंबे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## दिव्यांगांची सेवा घडावी ही आमच्यासाठी सर्वात मोठी उपलब्धी -सरपंच मंगेश शेलार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार यांनी विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी येथील दिव्यांग व्यक्तीसाठी भेट वस्तु तसेच गरीब नागरिकांकरिता छत्री वाटप कार्यक्रमाला प्रतिसाद लाभला.



या वेळी करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अपंगांसाठी दिव्यांग हा सन्मानपूर्वक शब्द वापरला. यावरून दिव्यांगांबद्दल मोदींना किती प्रेम आहे, हे लक्षात येते. त्याचबरोबर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रात प्रथमच दिव्यांग कल्याण मंत्रालय स्थापित केले. आमदार बालदी यांनी करंजाडेचा कायापालट केला आहे. तसेच आदिवासीच्या हक्कासाठी बालदी यांनी अधिवेशनात आवाज उटवला आहे.

## उंदरांच्या बंदोबस्तासाठी पिंजरे उपलब्ध करा

### दर्शना भोईर यांची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या विविध मार्केटमध्ये वाढलेल्या उंदरांचा बंदोबस्त करण्याच्या अनुषंगाने पिंजरे उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी पनवेल मनपा आयुक्तांकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी निवेदनही दिले आहे.

भोईर यांनी निवेदनात म्हटले आहे की, पनवेल महानगरपालिका हद्दीतील रोजबाजार भाजी मार्केट बाबासाहेब आंबेडकर पुतळा रोड), कोळीवाडा भाजी मार्केट, बालाजी भाजी मार्केट, जूने भाजी मार्केट या ठिकाणी उंदरांची संख्या वाढलेली असल्याने माल खराब करणे तसेच किमती वस्तुंची नासाडी करणे असे अनेक प्रकार वाढलेले असल्याने त्या ठिकाणी असलेला व्यापार वर्ग पुर्णपणे त्रस्त झालेला आहे. त्यामुळे सदरील समस्येवर तातडीने उरापयोजना करण्य अनुषंगाने पिंजऱ्यांची उपलब्धता करून मिळणे अत्यंत आवश्यक आहे.

पनवेल मनपा क्षेत्रातील प्रभाग क्र. १९ मधील उक्त उल्लेखीत भाजी मार्केटमध्ये वाढलेल्या उंदरांचा समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने पिंजऱ्यांची उपलब्धता करून देऊन या परिसलीन तमाम व्यापारी वर्गास दिलासा देण्यात यावा, असे निवेदनात नमुद केले आहे.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात कार्यशाळा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात गुरुवारी (दि.१७) विद्यार्थिनींसाठी कौशल्य विकास कक्षाच्या वतीने महिलांचे आरोग्य व व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थिनींमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे तसेच त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवून आणणे हा होता. या कार्यशाळेत व्हिस्पर कंपनीच्या महिला पदाधिकाऱ्यांनी महिला स्वच्छतेचे महत्त्व, महिलांच्या वेगवेगळ्या समस्या त्यावर घ्यावयाची काळजी, स्वच्छता साधने वापरण्याचे योग्य मार्ग इत्यादी विषयी सखोल मार्गदर्शन केले आत्मविश्वास, संवाद कौशल्य, व्यक्तिमत्त्व सादरीकरण अशा विविध पैलूंवर चर्चा करण्यात आली. या कार्यशाळेला महाविद्यालयातील विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला या वेळी उपस्थितांनी कार्यशाळेतील माहिती उपयुक्त असल्याचे सांगितले व अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन व्हावे अशी मागणी केली. महाविद्यालयाच्या



प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी कार्यशाळेचे आयोजन केल्याबद्दल कौशल्य विकास कक्षाचे अभिनंदन केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे संयोजन प्रा. रूपाली नागरेकर समन्वयक कौशल्य विकास कक्ष यांनी केले तसेच प्रा. प्रतीक्षा पाटील, प्रा. शिवानी मानकामे, प्रा. तनुजा सुमन, प्रा. करिष्मा कडव, प्रा. विवेक गरजे प्रा. शिवानी सोनकर, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## 'सीकेटी'त इन्वेस्टिचर समारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील सीकेटी इंग्रजी माध्यम विद्यालयात बुधवारी (दि.१६) विद्यार्थ्यांचा 'इन्वेस्टीचर समारोह' अतिशय उत्साह पूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत विद्यालयात असलेल्या ब्ल्यू, ग्रीन, रेड व यल्लो हाऊसचे कप्तान, उपकप्तान, मंत्री तसेच स्वयंसेवक यांना मान्यवरांच्या हस्ते बॅचेस व स्कार्फचे वितरण करण्यात आले.



कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे म्हणून नॅशनल बॅडमिंटन कोच योगेश पाटील उपस्थित होते. आजच्या युगात अभ्यासाबरोबरच खेळालाही महत्त्व देणे गरजेचे आहे. ज्ञानदाना बरोबरच खेळालाही प्राधान्य मिळायला हवे. या हेतूनेच आजच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सीकेटी इंग्रजी माध्यमातील इ. १० वी चा विद्यार्थी स्वस्तिक भोसले याला २०२५-२६ चा हेल्थ ॲण्ड वेल्थ दूत (ॲम्बॅसिडर) म्हणून घोषीत करण्यात आले. विद्यार्थ्यांनी चांगल्या आरोग्यासाठी खेळाचा जीवनात समावेष करणे आवश्यक आहे. त्यामुळे सकारात्मक वृत्ती बरोबरच नम्रता येते. खिलाडीवृत्ती मुळे पराभव पचविण्याची ताकद वाढीस लागते. खेळामुळे एकता आणि सहकार्याची भावना विकसित होते. कोणत्याही संकटाचा सामना करण्यात येतो असे यावेळी शाळेचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील शिक्षिका मनिषा नारखेडे यांनी केले. या कार्यक्रमास विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, विद्यालयाच्या पर्यवेक्षिका नीरजा अदुरी, इंग्रजी प्राथमिक विभागाच्या प्रमुख नीलिमा शिंदे, वैशाली पारधी तसेच पालक संघ व इतर मान्यवर उपस्थित होते.



**पनवेल : स्व. अनंत चंदर घरत यांच्या चौथ्या पुण्यतिथीनिमित्त विठ्ठल रखुमाई हरिपाठ मंडळ खारकोपर यांचा हरिपाठाचा कार्यक्रम झाला. या वेळी गायिका अनुसया घरत, आनंदी घरत, नंदा पाटील, सर्व हरिपाठ मंडळ मथुराबाई ठाकूर, मालती घरत, बामुबाई घरत, वृक्षणा पवार, शितल घरत, हिराबाई घरत, अर्चना माळी आदी उपस्थित होत्या.**

## शॉक लागून वीज कामगाराचा मृत्यू

**उरण :** तालुक्यातील चिरनेर येथील कंत्राटी वीज महेंद्र उर्फ मयूर रामचंद्र पाटील (वय ४८) यांचे नुकतेच आकस्मिक निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर १७ जुलै रोजी चिरनेर येथील स्मशानभूमीत विविध क्षेत्रातील मान्यवरांसह ग्रामस्थांच्या उपस्थितीत अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनामुळे चिरनेर विभागासह संपूर्ण उरण तालुक्यावर शोककळा पसरली आहे. महेंद्र पाटील हे विद्युत कर्मचारी म्हणून कार्यरत होते. बुधवार १६ जुलै रोजी सायंकाळच्या सुमारास रानसई आदिवासी वाडीतील वीज दुरुस्तीचे काम करीत असताना त्यांना विजेचा धक्का लागला होता.

## स्वरा कराओके स्टुडिओतर्फे मेरे मनपसंत गीत कार्यक्रम

### माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची लाभली प्रमुख उपस्थिती





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वरा कराओके स्टुडिओतर्फे सीबीडी बेलापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या 'मेरे मनपसंत गीत' विथ अवर बिल्व्हड सिंगर्स' या संगीतमय कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर म्हणून पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमात २५ गायक गायिकांचा सहभाग होता.

संतोष ताजने, प्रणाली पावसकर, श्यामकांत पाटील, विवेक परब, जीत निकम, नायडू, महेश हेमराजनी, निर्मला धोत्रे, सागर उपश्याम, जाहिदा, मीना शर्मा, राजेश शाहीर, देविदास साळवे, मधुसूदन शेर्लेकर, निविदा तांबे, प्रतिभा चंदनशिवे, साबा खान, शांती शानू, मनोज शिंदे, राहुल मोरे, साईसार्थक पुजारी, कृष्णा पुजारी, शरद हळणकर, रश्मी हळणकर या गायकांनी आपल्या गायनाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. तसेच यामध्ये चिमुकले गायक क्रिषा पुजारी व साई सार्थक यांनी सुद्धा आपल्या आवाजाने मने जिंकली.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभलेले परेश ठाकूर यांचे या कार्यक्रमाचे आयोजक शरद हळणकर, रश्मी हळणकर यांनी स्वागत सन्मान केला. या संगीतमय कार्यक्रमातून नवगायकांनाही एक व्यासपीठ मिळाले असून या आयोजनाबद्दल उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले.

## स्व. मोरू नारायण म्हात्रे यांचे विसावे पुण्यस्मरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालयात स्वर्गीय श्री मोरू नारायण म्हात्रे यांच्या विसाव्या पुण्यस्मरणानिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. या वेळी प्रसिद्ध उद्योगपती व माजी नगराध्यक्ष व मोरू नारायण म्हात्रे यांचे पुत्र जे.एम.म्हात्रे यांनी स्व. मोरु नारायण म्हात्रे साहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला.

माजी उपसरपंच विजय घरत, माजी सरपंच माई भोईर, राहुल घरत, वसंत पाटील, रघुनाथ घरत, जयवंत देशमुख, श्रीकांत घरत, मीनाक्षी पाटील, रामदास ठाकूर, अनंता म्हात्रे, सचिन घरत, राजेश जनार्दन म्हात्रे, जितेंद्र म्हात्रे, शाळेचे स्थानीय समितीचे चेअरमन भार्गव ठाकूर, अनंता ठाकूर, कमलाकर देशमुख, रघुनाथ देशमुख, अरुण म्हात्रे, सुहास देशमुख, प्रमोद पाटील, लक्ष्मण पाटील, आकाश पाटील, रमेश ठाकूर, शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर, पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, पर्यवेक्षक अरुण जोशी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी स्व. मोरू नारायण म्हात्रे यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन केले.





## दुखवटा

### उषा मोने



**पेण :** ज्येष्ठ पत्रकार तथा मुंबई मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष आणि अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष कै यशवंत मोने (नाना मोने) यांची पत्नी उषाताई तथा 'नानी' यशवंत मोने यांचे अल्पशा आजाराने शुक्रवार दिनांक १८ रोजी दु:खद निधन झाले. त्या ८५ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात सुपुत्र संदीप, सून हर्षदा आहेत.

# शाळा, महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रम

## निवडक

### राखी तयार करणे कार्यशाळा



**पनवेल :** रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाउन चॅरिटेबल ट्रस्ट संचलित श्रीमती राधाबाई खेमचंद परमार रोटरी कर्णबधिर मुलांची विशेष निवासी शाळा नवीन पनवेल येथे इनरव्हील क्लब सदस्या प्राजक्ता नेरकर यांनी विद्यार्थ्यांकडून राखी तयार करणे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या वेळी ट्रस्ट चेअरमन अरविंद सावळेकर आणि ट्रस्ट सचिव प्रमोद वालेकर, शाळेच्या प्र. मुख्याध्यापिका शैला बंदसोडे व शाळेतील शिक्षक कर्मचारी वृंद उपस्थित होते. उपस्थित सर्व विद्यार्थ्यांनी स्वतः राखी तयार करून स्वनिर्मितीचा आनंद घेतला व कार्यशाळा यशस्वीरित्या झाली.

### स्वप्नील गुप्ते यांची नियुक्ती

**पनवेल :** पॅक्टिल इलेक्ट्रॉनिक्स प्रायवेट लिमिटेड कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर स्वप्नील प्रदीप गुप्ते यांची जवाहर को-ऑप इंडस्ट्रियल इस्टेट, कामोठे, पनवेल यांच्या अध्यक्षपदी बहुमताने नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले. या वेळी भाजप ओबीसी मोर्चा सोशल मीडिया जिल्हा संयोजक तथा शहर संयोजक प्रसाद हनुमंते आणि सागर रोकडे यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. गुप्ते यांच्या नेतृत्वाखाली औद्योगिक इस्टेटच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास अनेकांनी व्यक्त केला आहे.





**पनवेल : सचिन हरिभाऊ गायकवाड यांना वाढदिवसानिमित्त बाळाराम सावंत आणि दै.रामप्रहरचे व्यवस्थापक दादाराम मिसाळ यांनी शुभेच्छा दिल्या.**

## बीसीटी विधी कॉलेजचे स्नेहसंमेलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील भागूबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन नुकतेच झाले. या सोहळ्यात विद्यार्थ्यांच्या विविध क्षेत्रांतील यशाचे कौतुक करण्यात आले.




कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी.देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे, पब्लिक स्कूलचे प्राचार्य किरण सुतार, तसेच संस्थेचे सदस्य ॲड. राहुल घरत यांची प्रमुख उपस्थिती होती.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये आयोजित विविध स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांना याप्रसंगी पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या यशाबद्दल मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आणि भविष्यातील वाटचालीसाठी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. या सोहळ्याला महाविद्यालयाच्या प्राचार्या सानवी देशमुख, बीए एलएलबी कोऑर्डिनेटर धनश्री कदम, इतर प्राध्यापक वर्ग आणि विद्यार्थी उपस्थित होते.

क्रीडा, कल्चरल कमिटी, स्टुडंट कौन्सिल, मुट कोर्ट यांसारख्या विविध क्षेत्रांत बक्षिसे पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांचा यावेळी विशेष सन्मान करण्यात आला. सर्व मान्यवरांनी बक्षीस पात्र विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या पुढील वाटचालीसाठी सदिच्छा दिल्या.

## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलची सहल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी पावसाळी सहल आयोजित करण्यात आली. ही सहल संत गाडगे बाबा उद्यान, नेरूळ येथे गेली होती. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना नैसर्गिक वातावरणाचा अनुभव देणे आणि शारीरिक व्यायामास प्रोत्साहन देणे असा होता.

सकाळी शाळेतून सर्व विद्यार्थी, शिक्षक नियोजित वेळेनुसार पावसाळी सहलीसाठी नेरूळ येथे रवाना झाले. ट्रेकदरम्यान विद्यार्थ्यांनी पावसाच्या सरींचा आनंद घेत, हिरवळीने नटलेल्या डोंगररांगा, विविध प्रकारची झाडं, फुलं आणि पक्षी यांचे निरीक्षण केले. व मार्गदर्शक शिक्षकांनी त्यांना निसर्गवाचनाचे आणि पर्यावरण रक्षणाचे महत्त्व पटवून दिले. उद्यानातील नाव स्वच्छतेबाबत संत गाडगे बाबांच्या संपूर्ण कार्याची माहिती देण्यात आली. यानिमित्ताने विद्यार्थ्यांनी सामाजिक जबाबदारीचाही अनुभव घेतला.

सहल कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेचे चेअरमन परेश ठाकूर, मुख्याध्यापीका मुक्त खटावकर, शिक्षक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे विशेष योगदान लाभले. विद्यार्थ्यांनी मिळालेला अनुभव त्यांच्या मनात कायमचा कोरला गेला आहे.



## आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ स्पर्धेची वर्ग अंतर्गत फेरी उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला चालना देण्यासाठी आणि नव्या पिढीला आत्मविश्वासाने बोलता यावे या उद्देशाने आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ - वक्तृत्व स्पर्धेची वर्ग अंतर्गत फेरी पनवेल महापालिका प्राथमिक शाळा क्रमांक ०५, ०६ व ०८ येथे यशस्वीपणे पार पडली.



या फेरीत इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी माझं घर, माझं स्वप्न, माझा पहिला शाळेचा दिवस, शिक्षणाचं महत्त्व, प्लास्टिक मुक्त भारत, स्वच्छ भारत असे दर्जेदार विषय निवडून आत्मविश्वासाने भाषणं सादर केली. मुलांच्या शब्दांमधून त्यांच्या कल्पनाशक्तीला आणि विचारशक्तीला सुंदर आकार मिळाल्याचे चित्र दिसले.

या स्पर्धेमुळे लहान वयातच सार्वजनिक व्यासपीठावर मोकळेपणाने व्यक्त होण्याचे धाडस विद्यार्थ्यांना मिळाले. पालक व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना उत्तम तयारीसाठी प्रोत्साहित केले. या उपक्रमाचे श्रेय कोशिश फाउंडेशनचे उपाध्यक्ष व स्पर्धा प्रमुख मयुरेश नेतकर यांच्या पुढाकाराला जाते. त्यांनी सांगितले, विद्यार्थ्यांनी अशा स्पर्धांमुळे आत्मविश्वास कमवावा, विचारांना दिशा मिळावी आणि पुढील फेरीसाठी अजून तयारीने उभे राहावे, हीच अपेक्षा आहे.

या वर्ग अंतर्गत फेरीतील निवड झालेल्या विद्यार्थ्यांना विभागीय फेरीत भाग घेता येणार आहे. पालक, शिक्षक व विद्यार्थी यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे स्पर्धा यशस्वी झाली. या वेळी भाजयुमो युवा वॉरियर्स जिल्हा संयोजक देवांशू प्रभाळे, अनिमेष पटवर्धन, हर्षल बहाडकर, कोमल कोळी, जयेश चव्हाण, अनिकेत भोईर, माजी नगरसेविका हेमलता म्हात्रे, परेश पाटील आदी उपस्थित होते.

> **विद्यार्थ्यांनी शब्दांतून आपले विचार समाजापर्यंत पोहोचवणे हीच खरी व्यक्तिमत्व घडवणारी गोष्ट आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला व्यासपीठ मिळावे, हेच आमचे ध्येय आहे.**
>
> **-देवांशू प्रभाळे, जिल्हा संयोजक, युवा वॉरियर्स, भाजयुमो**

## वर्धापन दिन उत्साहात































# रायगडमधील पोल्ट्री व्यावसायिक आक्रमक

## पशुसंवर्धन उपायुक्तांना घेराव

**अलिबाग : प्रतिनिधी**

पोल्ट्री कंपन्या व खाद्य पुरवठादारांच्या मनमानीविरोधात रायगड जिल्ह्यातील पोल्ट्री व्यावसायिक शेतकरी आक्रमक झाले आहेत. अलिबाग येथील पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालयात धडक देवून त्यांनी आयुक्तांना घेराव घातला आणि चांगलेच धारेवर धरले. पक्षांना पुरवल्या जाणाऱ्या खाद्याच्या बॅगांवर त्यातील अन्नघटक नमूद केले जात नाहीत. वर्षभरापूर्वी याबाबतच्या शासन निर्णय होवूनदेखील कुठलीच कार्यवाही होत नसल्याचा आरोप पोल्ट्री व्यावसायिक शेतकऱ्यांनी केला आहे.

पोल्ट्रीतील पक्ष्यांसाठी पुरवल्या जाणाऱ्या खाद्याच्या बॅगवर खाद्यातील अन्नघटक नमूद केले जात नाहीत. त्याला शेतकऱ्यांचा आक्षेप होता. परंतु शेतकऱ्यांच्या रेट्यानंतर शासनाने ते बंधनकारक केले आहे. या निर्णयाला वर्ष उलटून गेले तरी खाद्य पुरवठा कंपन्यांकडून ते छापले जात नाहीत. याबाबतचा जाब बैठकीत विचारण्यात आला. तसेच पोल्ट्री कंपनी आणि शेतकरी यांच्यात जो सामंजस्य करार केला जातो या कराराचा नमुना शासनाने



ठरवून दिला आहे. त्या नमुन्यात करार व्हावा यासाठी शेतकरी आग्रही होते.

वर्षभरापूर्वी याच संदर्भात जिल्हयातील पोल्ट्री व्यावसायिक, खाद्य पुरवठादार कंपन्या तसेच पशुसंवर्धन उपायुक्त यांची संयुक्त बैठक झाली होती. या बैठकीत १५ ऑक्टोबर नंतर पुरवण्यात येणाऱ्या खाद्याच्या बॅगांवर खाद्यातील अन्नघटक नमूद करण्यात यावेत. तसेच यापुढे करार करताना शासनाने घालून दिलेल्या अटी, शर्ती यांचे पालन करून ठरवून दिलेल्या नमुन्यातच करार करण्यात यावा, असे निर्देश पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सचिन देशपांडे यांनी संबंधित कंपन्यांना दिले होते, परंतु वर्षभरात यावर कुठलीच कार्यवाही न झाल्याने पोल्ट्री व्यावसायिक संतापले आहेत. आज पोल्ट्री व्यावसायिक शेतकरयांशी झालेल्या चर्चेअंती पुढील १५ दिवसात त्यांच्या मागण्यांची पूर्तता केली जाईल असे अश्वासन डॉ. देशपांडे यांनी दिले.

**कुक्कुट खाद्य आणि करार पदधतीने कुक्कुटपालन केले जाते त्यासंदर्भात जे शासन निर्णय झाले आहेत त्याची अंमलबजावणी व्हावी अशी पोल्ट्री व्यावसायिक शेतकरयांची मागणी होती. पुढील १५ दिवसांत याबाबत कार्यवाही केली जाईल.**
**–डॉ. सचिन देशपांडे,**
**उपायुक्त, पशुसंवर्धन विभाग**

### हे छापणे बंधनकारक...

उत्पादक संस्थेचे नाव व पत्ता उत्पादक परवाना क्रमांक , कुक्कुट खाद्य उत्पादनाचा दिनांक व बॅच क्रमांक सदर उत्पादन वापरण्याचा अंतिम दिनांक , निव्वळ वजन मार्केटिंग कंपनीचे नाव व पत्ता कुक्कुट खाद्यात पशुजन्य घटक असल्यास नमूद करावे. उत्पादित केलेल्या प्रत्येक बॅचमधील कुक्कुट खाद्यातील विविध अन्न घटकांचे विश्लेषण करणे आवश्यक आहे.

# 'शुन्य कचरा व्यवस्थापनासाठी नागाव ग्रामपंचायत कटिबद्ध'



**रेवदंडा : प्रतिनिधी**

स्वच्छ व सुंदर नागाव संकल्पनेतून स्वच्छतेसाठी वाटचाल करताना, नागाव ग्रामपंचायतीच्यावतीने ग्रामस्थांना कचरा कुंडी वाटप शुभारंभ तसेच ग्रामस्थांच्या सुरक्षीततेसाठी महिला आर्थिक साक्षरता व विमा योजना अर्ज शिबीरांस मोठा प्रतिसाद लाभला.

नागाव ग्रामपंचायतीच्या सभागृहात नागाव ग्रामपंचायतीचे वतीने बुधवार दि. १६ जुलै रोजी सकाळी ११.०० वाजता ग्रामस्थांना कचरा कुंडी वाटप तसेच ग्रामस्थांच्या सुरक्षीततेसाठी महिला आर्थिक साक्षरता व विमा योजना अर्ज शिबीर आयोजीत करण्यात आले होते. या प्रसंगी नागाव ग्रा.प.सरपंच हर्षदा निखिल मयेकर, माजी सरपंच नंदकुमार मयेकर, आम्ही संस्थेच्या प्रमुख रोसलिन परेरा,वतसाह फाउंडेशन प्रमुख रोहीत वतसाह, आम्ही संस्था कार्यप्रमुख समीर मोरे तसेच नागाव ग्रा.प. अधिकारी श्वेता कदम, ग्रा.प.सदस्या प्रियंका काठे, ग्रा.प.सदस्या अंकिता शेवडे,ग्रा.प.सदस्या लिना म्हात्रे, ग्रा.प.सदस्या निकिता पाडेकर, ग्रा.प.सदस्या मंगळा नागे, ग्रा.प.सदस्या विणा विकास पिंपळे, ग्रा.प.सदस्य सुरज म्हात्रे, तसेच ग्रामपंचायत कर्मचारीवर्ग आणि मोठया संख्येने नागाव महिला व ग्रामस्थ यांची उपस्थिती होती.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षा हर्षदा मयेकर यांनी उपस्थित ग्रामस्थांना कचरा व्यवस्थापनाबाबत माहिती व मार्गदर्शन केले. तर आम्ही संस्थेच्या प्रमुख रोसलिन परेरा यांनी नागाव ग्रा.प. व सरपंच हर्षदा मयेकर यांनी चालविलेल्या स्तुत्य उपक्रमास कौतुकास्पद म्हटले. त्यानंतर नागाव ग्रामस्थांच्या घरोघरी जाउन कचरा कुंडीचे वाटप करून त्यांना कचरा व्यवस्थापनाची माहिती देण्याचा शुभारंभ करण्यात आला. तसेच महिला आर्थिक साक्षरता संकल्पनेतून विमा अर्ज मार्गदर्शन व शुभारंभ करण्यात आला.

यावेळी नागाव ग्रा.प. सरपंच हर्षदा मयेकर यांनी म्हटले की, नागाव पर्यटनस्थळ म्हणून नावारूपास येत असून येथील पर्यटक व ग्रामस्थांसाठी शुन्य कचरा व्यवस्थापन संकल्पनेतून कचरा कुंडी वाटप करण्याचा शुभारंभ करण्यात आला, ग्रामस्थांचे घरोघरी जाउन कचरा कुंडीचे वाटप करून त्यांना ओला कचरा व सुका कचरा यांचे संकलन व विल्हेवाट याबाबत मार्गदर्शन करण्याची संकल्पना नागाव ग्रामपंचायतीने राबविण्यात येत आहे महिला आर्थिक साक्षरतेच्या व बचत गटाच्या माध्यमातून विमा अर्ज संकल्पना राबविला जात असल्याचे सांगीतले. यासाठी बँक ऑफ इंडिया व पंचायत समितीयांचे माध्यमातून विमा अर्ज शिबीर घेतले.

# तळा केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**तळा : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन महत्वाचे ठरत असून पालकांची मिळणारी साथ यामुळे यश मिळत असते.आता या यशा बरोबरच पुढील वर्षाचे नियोजन करून अधिक चांगला निकाल लावण्यासाठी आता पासून प्रयत्न करूयात, असे प्रतिपादन गट शिक्षणाधिकारी सुरेखा तांबट यांनी केले.

तळा केंद्राच्या माध्यमातून जिल्हापरिषद शाळा, तळा मराठीच्या सभागृहात १६ जुलै रोजी पत्रकार पुरषोत्तम मुळे यांचे अध्यक्षतेखाली शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी विद्यार्थी व नवोदय इत्यादी विविध स्पर्धा परीक्षा यशस्वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव प्रमुख अतिथी गटविकास अधिकारी महादेव शिंदे, गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट,माजी केंद्रप्रमुख तथा विस्ताराधिकारी दिपक ठाकूर,संध्या ठाकूर,शा.व्य.समिती. अध्यक्ष भास्कर गोळे,व केंद्रप्रमुख तथा विस्तारअधिकारी मुबीन वासकर,गौतम



मनवर , केंद्रप्रमुख धर्मा राणे, रवींद्र फडके, रविंद्र पवार,संतोष पटाईत, मुख्याध्यापक लियाकत राऊत, सुप्रिया जामकर, सुनिल बयकर,मित्तल वावेकर, साधनव्यक्ती अभिजित खांडेकर,आदिंसह पालक, विद्यार्थी, साधनव्यक्ती शिक्षक,मोठ्यासख्येने उपस्थित होते.

शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मधील घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेतील आरटीएस परीक्षेतील केंद्रातील १२ यशस्वी विद्यार्थी,मंथन परीक्षेतील २० यशस्वी विद्यार्थी,तसेच याच केंद्रातील तळा मराठी शाळेतील शिष्यवृत्ती परीक्षेतील १८ यशस्वी विद्यार्थी,याच शाळेचे होमी भाभा परीक्षा यशस्वी ३ विद्यार्थी, गणित संबोध परीक्षा २० विद्यार्थी, नवोदय पात्र ३ विद्यार्थी, सैनिक स्कूल १ विद्यार्थी अशा विविध स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांचे हस्ते सन्मानित करण्यात आले आहे.

## वडघर सरस्वती विद्यामंदिर येथे महाआरोग्य शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

ग्रामीण भागात आरोग्य विषयक जनजागृती व्हावी व ग्रामीण भागातील विद्यार्थी व नागरिकांच्या आरोग्यविषयक समस्या दूर व्हाव्यात आजाराचे वेळीच निदान व्हावे याकरिता श्री प्रतिष्ठानच्या वतीने सोमवार दि. २१ जुलै २०२५ रोजी सरस्वती विद्यामंदिर वडघर मुद्रे येथे दुपारी दोन ते सायंकाळी पाच वाजता विनामूल्य महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे .

या आरोग्य शिबिरात मोफत तपासणी केली जाणार असून औषधोपचार देण्यात येणार आहेत तसेच तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. या मोफत आरोग्य शिबिरासाठी उपजिल्हा रुग्णालय माणगाव यांचे विशेष सहकार्य लाभले असून पंचक्रोशीतील नागरिक व विद्यार्थ्यांनी या आरोग्य शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन श्री प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

# डेरवण रुग्णालय व ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयातर्फे प्रशालांमध्ये मार्गदर्शन

**पोलादपूर : प्रतिनिधी**

शहरातील विविध विद्यालयामध्ये डेरवण येथील भ.क.ल. वालावलकर ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयातर्फे किशोर वयात होणाऱ्या शारीरिक व मानसिक बदलांना सामोरे जाताना या विषयावर मार्गदर्शन शिबिर यशस्वीपणे आयोजित करण्यात आले. शहरातील आपला दवाखाना येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिरासही नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

साने गुरुजी विद्यालयात इयत्ता ७ वी ते इयत्ता १० वीच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना किशोर वयात होणाऱ्या शारीरिक व मानसिक बदलांना सामोरे जाताना या विषयांवर मार्गदर्शन शिबिर आयोजित केले. या शिबिरासाठी भ.क.ल.वालावलकर रुग्णालय व ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय यांच्यामार्फत रुग्णालयातील डॉ. रूपाली चव्हाण, डॉ. स्वाती सोनवणे, डॉ. चैतन्य म्हस्के, डॉ.अमित वैद्य यांनी उपस्थित राहून विद्यार्थी व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमप्रसंगी सहयोग प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष रमेश चव्हाण, विश्वस्त सुखदेव मोरे,



विद्यालयाच्या मुख्याध्यापिका देशमुख, सहयोगचे सदस्य उदय खरे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन संस्थेतर्फे स्वागत करण्यात आले.

मुलांच्या किशोरवयात यांच्या मनामध्ये होणारे गोंधळ, शारीरिक वाढ, व्यक्तिमत्वामध्ये होणारे बदल, स्व–निर्मिती व जाणीव, नेतृत्व, जबाबदारी आदी विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. वालावलकर रुग्णालय व ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय यांच्यामार्फत पोलादपूर शहरातील आपला दवाखाना येथे मोफत नाक, कान, घसा आणि डोळ्यांची तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले

# माणगाव तालुका प्रेस क्लबतर्फे प्रगतशील शेतकऱ्यांचा सन्मान

**माणगाव : बातमीदार**

गेल्या अनेक वर्षापासून माणगांव तालुका प्रेस क्लबच्या माध्यमातून अनेक लोक उपयोगी कार्यक्रम हे राबविले जात आहेत. गुरुवार दि.१७ जुलै २०२५ रोजी माणगांव तालुक्यातील दोन प्रगती शील शेतकऱ्यांची निवड करून त्या शेतकऱ्यांचा सन्मान कार्यक्रम आयोजित केला होता.

माणगांव तालुक्यातील चाच या गावचे एक प्रगतशील शेतकरी सहदेव सदू नाकते व पत्नी सुजाता नाकते या प्रगतशील शेतकऱ्यांला माणगांवचे प्रांतअधिकारी डॉ. संदिपान सानप, प्रेस क्लबचे अध्यक्ष संतोष सुतार, वनपरिक्षेत्र अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या हस्ते सन्मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

नाकते कुटुंबियांनी गावठी चिंबोरीची



शेती केली आहे हे विशेष म्हणावे लागेल माणगांव तालुका प्रेस क्लबच्या वतीने प्रांत अधिकारी डॉ.संदिपान सानप,प्रेस क्लबचे मुख्य संघटक पद्माकर उभारे,उपाध्यक्ष आरती म्हामुणकर यांच्या हस्ते शाल, सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

इंदापूर विभागातील माकटी या गावचे प्रगत शील शेतकरी गणपत गोविंद मुरकर यांचा देखील माणगांव तालुका प्रेस क्लब तर्फे माणगांव तालुका कृषी अधिकारी किरण पडवळकर, माणगांव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नरेंद्र बेलदार,प्रेस क्लबचे अध्यक्ष संतोष सुतार,मुख्य संघटक पद्माकर उभारे, कार्याध्यक्ष गौतम जाधव,इंदापूरचे माजी उपसरपंच उदय अधिकारी,श्रध्दा यादव यांच्या हस्ते सन्मानीत करण्यात आले.


**Tender Notice**

MAHAVITARAN

Following Tenders are invited from Eligible Bidders by E-tendering Process under Goregaon Division under Pen Circle Raigad District. The Details are as below-

| Sr. No. | Tender No. | Nature of Work | Estimated Cost (in Lakhs) | Amount of EMD (in Rs.) | Tender Cost Fee (in Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | EE/GRN/ e-Tender/ T-05/ 2025-26 | Design, shop test, supply, transport, fixing of L.T. spiral type PVC Spacers to L.T. Lines and allied works in the jurisdiction of Goregaon Division under Pen Circle. | 10.00 | 10,000/- | 1000+18 %GST= 1180/- |

The Tender Documents are available on MSEDCL Official Website http://etender.mahadiscom.in/ & can be downloaded from Dt. 19.07.2025 to Dt. 24.07.2025. Submission of Bid is up to Dt. 24.07.2025 till 23.55 Hrs. The Bidders are requested to get registered for E-tendering Procedure. Contact Person- Addl. Executive Engineer Tel No. 9029135601. M.S.E.D.Co.Ltd. Chinchavali, Goregaon, Tal: Mangaon Dist.-Raigad-402103.

**PRO no. 213** **Executive Engineer, Goregaon Division**


# रानोमाळी फुले बहरली...

## वातावरणातील योग्य बदलाचा परिणाम; निसर्गप्रेमी आनंदले

**माणगाव : प्रतिनिधी**

संततधार पडणारा पाऊस ,पावसाळ्यातील आल्हाददायक गारवा यामुळे रायगड जिल्ह्यातील मालराने विविध फुलांनी बहरली आहेत. निसर्ग आणि पर्यावरणाच्या विविधतेने रायगड जिल्ह्यातील जंगल समृद्ध आहे. विविध प्रकारच्या वनस्पती ,लता वेलीनी घनदाट असलेले जंगल पावसाळ्यात हिरव्या, पिवळ्या, लाल,गुलाबी रंगांनी भरून गेले आहेत.

पावसाळा सुरू झाल्यानंतर कोकणातील मालरानात ,डोंगरावर विविध प्रकारच्या फुल वनस्पती उगवतात.काही वनस्पती लगेच फुलतात तर काही परतीच्या पावसात फुलून येतात. या वर्षी लवकर सुरू झालेल्या पावसाने सर्व मालरान श्रावणापूर्वीच फुलून गेले आहे. त्यामुळे रानाची शोभा



अवर्णनीय दिसत आहे. गेल्या काही दिवसात योग्य वातावरण मिळत असल्याने रान फुलांचा बहर सुरू झाला आहे.

साधारणत:आषाढ , श्रावण ,भाद्रपद महिन्यात विविध रानफुलांना बहर येतो.याच काळात विविध धार्मिक सण असतात .या सणात धार्मिक विधी साठी याच फुलांचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. तेरडा ,रान भेंडी ,सोनकी,रानआलं,गेंद, मोतीया व कवाली –अग्निफुलें इत्यादी फुले मुबलक प्रमाणात बहरत असून अतिशय विहंगम दृश्य मालरानावर दिसत आहेत.

**पावसाळ्यात विविध प्रकारची रानफुले बहरली आहेत. तृण फुलांनी माळरानावर सुंदरता आणली असून हे दृश्य कॅमेऱ्यात टिपण्याची मोठी संधी आहे. कोकणात निसर्गाची अद्भुत श्रीमंती असून रानफुलांचा पावसाळ्यातील बहर हा तर मोठा ठेवा आहे. याचे जतन व संवर्धन होणे आवश्यक आहे. जंगल व माळरानात निसर्गाचा अद्भुत ठेवा आहे. विविध रंगाची ही फुले आकर्षक आहेत. अतिशय निसर्गसंपन्न या जंगलांचे संवर्धन व्हावयास हवे. या फुलांचा अधिक अभ्यास होणे गरजेचे आहे.**
**–विलास देगावकर,**
निसर्गप्रेमी, छायाचित्रकार


**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे – देहरंग, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिन शेतीची मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे ७/१२ चे उताऱ्यावरील कब्जेदार सदरांत नमूद असलेल्या जमीन मालकाकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**बिन शेतजमिनीच्या मिळकतीचे वर्णन**
**मौजे – देहरंग, ता. पनवेल, जि. रायगड**

| जमीन मालकांचे नांव | गट क्र. उपविभाग क्र. | क्षेत्र (ए.आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| श्री. हेमंत रामचंद्र डाके | १/य/३९ | ००.१०.१० | १०१.०० |

सदर शेतजमिनीवर कोणाचा, कोणत्याही प्रकारचा हक्क–हितसंबंध, कुळवहिवाट, ताबेकब्जा, बोजा, एम.ओ.यू., साठेकरार, वचन चिठ्ठी, बयाणापावती, फरोक्त खत, खरेदीखत, मृत्यूपत्र, गहाण, दान, बक्षिस, लीज, लिन, पोटगी हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या लेखी हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **११ (अकरा)** दिवसांचे आंत योग्य त्या सकृत दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशील सदर शेतजमिनीचा खरेदी–विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व त्या आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, कृपया यांची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल **सही/–**
दिनांक :– १८/०७/२०२५ **ॲड. श्री. स्वप्नेश संजय घरत**

ऑफिस : ००१, पहिला मजला, ए–विंग, यशोकिरण को. ऑप. हौ. सोसायटी, सावरकर चौक, पनवेल–४१०२०६, ता. पनवेल, जि. रायगड. मोबा. ९६९९०३६४३२/८३६९४९४३४१



**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६
**जाहीर ई–निविदा सूचना**

जा. क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.३३४/३४४/२०२५ दिनांक : १८/७/२०२५

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय / निम शासकीय (Centeral Government /State Government /Government under taking) विभागात खालील कामासाठी पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी–१ शतमान पद्धतीनुसार जाहिर ई–निविदा मागवित आहेत.

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/43 2025-2026 | पनवेल महानगरपालिका हद्दीतील भुखंड क्र. ८अ + ८ब, सेक्टर – १८, नवीन पनवेल (पश्चिम) या भुखंडावर माता व बालसंगोपन केंद्र (हिरकणी – ४५० बेड) उभारणे. | १५४,१६,२३,८९४/– |

या कामाच्या ई– निविदे बाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. १९/०७/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. संबंधित निविदा धारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/–**
**शहर अभियंता**
पनवेल महानगरपालिका

# वर्धापन दिन उत्साहात


























दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# महाविद्यालयाच्या आवारात कचऱ्याचे साम्राज्य

## श्रीवर्धन येथील प्रकार



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन येथील गोखले महाविद्यालयाच्या आवारामध्ये कचरा व घाण व चिखल याचा खच पडला असून त्या ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरलेली पाहायला मिळते. गोखले महाविद्यालयाच्या परिसरातच गोखले विद्यालयाची इंग्रजी माध्यमाची शाळा आहे. या शाळेमध्ये लहान लहान विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या शालेय विद्यार्थ्यांसह महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे देखील आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. श्रीवर्धन येथील गोखले महाविद्यालय हे आराठी ग्रामपंचायत हद्दीमध्ये येते.

आराठी ग्रामपंचायतची नियमित घंटागाडी नसल्यामुळे नागरिक जागा मिळेल त्या ठिकाणी कचरा टाकत असतात. आराठी ग्रामपंचायत हद्दीतील कचरा सद्यस्थितीमध्ये गोखले महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारा समोरील भागात टाकण्यात येतो. कचऱ्या बरोबरच या ठिकाणी मेलेले कुत्रे, मांजर यांनादेखील टाकण्यात येते. सर्व ग्रामपंचायतींमध्ये स्वच्छता अभियान चांगल्या प्रकारे राबवण्यात येते, परंतु आराठी ग्रामपंचायत हद्दीमध्ये नागरी वस्ती प्रचंड प्रमाणात वाढली असून त्या ठिकाणी कचरा रस्त्यावर टाकल्यामुळे श्रीवर्धन दिघी मार्गावरून जाणाऱ्या प्रवाशांना ही दुर्गंधीचा सामना करावा लागतो.

आराठी परिसरातच पेट्रोल पंपाच्या बाजूला असलेल्या एका इमारतीचे सांडपाणी व संडासच्या टाक्यांमधील पाणी मुख्य मार्गावर वाहत असल्याने त्या ठिकाणीदेखील दुर्गंधी पसरलेली पाहायला मिळते. सध्या पावसाळा सुरू असल्यामुळे सदरचा कचरा वाहून गोखले महाविद्यालयाच्या आवारात गेला आहे. त्यामुळे गोखले महाविद्यालयात व विद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. तरी गोखले महाविद्यालयाच्या प्रशासनाने आराठी ग्रामपंचायत जवळ संपर्क साधून सदर कचरा उचलण्यासाठी त्यांना कळवावे, अशी मागणी पालक वर्गामधून केली जात आहे. तसेच आराठी ग्रामपंचायत हद्दीमध्ये कचऱ्याचा प्रश्न गंभीर असून त्या ठिकाणी सांडपाण्याची समस्यादेखील मोठ्या प्रमाणावर आहे. याकडे स्थानिक प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे.

# माथेरानमध्ये रस्त्यांची डागडुजी



**माथेरान : बातमीदार**

माथेरान पर्यटनस्थळाच्या मुख्य रस्त्यावर काही निकृष्ट क्ले-पेव्हर ब्लॉकमुळे रस्ते खड्डेमय झाले होते. यामुळे या रस्त्यांवरून चालताना नागरिकांना आणि येणाऱ्या पर्यटकांना तसेच येथील ई-रिक्षा चालकांना तारेवरची कसरत करावी लागत होती. रस्त्यांची अक्षरशः दुर्दशा झाली होती.माथेरान शहरातील रस्त्यांची संपूर्ण दुर्दशा झाल्याची बातमी १६ रोजी दैनिक रामप्रहर ने दिली होती. स्थानिक प्रशासनाने बातमीची दखल घेत येथील रस्त्यांची डागडुजी करण्यास ततातडीने सुरुवात केली आहे.

माथेरान पर्यटनस्थळी बाराही महिने पर्यटकांची रेलचेल असते.पावसाळी पर्यटन हंगाम सुद्धा सध्या जोमात सुरू आहे. दररोज हजारोंच्या संख्येने पर्यटक शहरात दाखल होत आहेत. पर्जन्यवृष्टीदेखील जोरदार सुरू आहे. जोरदार बरसणाऱ्या पावसामुळे रस्त्याची दुर्दशा झाली आहे. खड्डेमय झालेल्या रस्त्यामुळे पाय मुरगळुन किरकोळ अपघाताच्या घटना घडल्या आहेत

याबाबत दै.रामप्रहरमध्ये १६ रोजी रस्त्याची दुर्दशा, प्रशासन हतबल या मथळ्याखाली वृत्त प्रसिद्ध झाल्या नंतर आणि येथे व्यापारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी नगरपालिका कार्यालयात निवेदन सादर केल्या नंतर प्रशासनाने या ठिकाणी ठोस पावले उचलत मुख्य महात्मा गांधी रस्त्याची डागडुजी करण्यास सुरुवात केली आहे, मात्र ज्या ठिकाणी अधिक खड्डेमय रस्ता आहे त्या रेल्वे स्टेशन जवळील दिवाडकर हॉटेल पासून कामाला सुरुवात करण्याऐवजी माधवजी उद्यान येथून कामाला सुरुवात केल्यामुळे रेल्वे स्टेशन भागात पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून रस्त्यांवरील खड्डे चुकवत मार्गक्रमन करावे लागत आहे.

त्यातूनच निदान रस्त्यावरील खड्डे भरण्यास सुरुवात झाल्यामुळे स्थानिकांनी तूर्तास तरी समाधान व्यक्त केले आहे. खड्डे भरण्याची कामे आता युद्धपातळीवर पूर्ण करून दस्तुरी कडे जाणाऱ्या काळोखी या उताराच्या ठिकाणी रस्त्यांची अतिशय दयनीय अवस्था झाली असून वेळप्रसंगी ई-रिक्षाला अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.म्हणून सदरचा रस्ता देखील ताबडतोब उत्तम प्रकारे बनवला गेला पाहिजे, असे ई-रिक्षाचालक बोलत आहेत.

# वीज चोरी पकडल्यावर महावितरण कर्मचाऱ्यांना दमदाटी; गुन्हा दाखल

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड उप विभाग कर्मचारी यांनी एक विशेष पथक तयार करून नांदगाव विभागातील वीज चोरी पकडण्यासाठी प्रयत्न करीत असताना वीज चोरी करणाऱ्या ग्राहकास पकडले असता संबंधित त्याच्या लोकांनी महावितरण कर्मचारी यांना तुमचे हात पाय तोडून टाकेन, जीवे ठार मारण्याची धमकी व धक्का बुक्की केल्याप्रकरणी नांदगाव येथील एक अज्ञात व्यक्ती तो फरार आहे. त्याचप्रमाणे समीर कासिम पठाण व शहजाद कासिम पठाण यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या बाबतचे सविस्तर वृत्त असे की, मुरूड महावितरण मधील नांदगाव विभागाचे कनिष्ठ अभियंता कासिम शेख, कोकबान शाखा अभियंता संदेश होंडे, आगरदांडा शाखा अभियंता मनोज देशमुख,महिला कर्मचारी गौरी राठोड हे सर्व कर्मचारी नांदगाव विभागातील सुरुळपेठ, खरीकवाडा व अन्य भागात फिरून वीज चोरी पकडत होते. यासाठी ते घरामध्ये असणारे मीटर तपासात होते. त्यांनी नांदगाव परिसरात एका वीज मीटर ची तपासणी केली असता त्यांना तिथे वीज चोरी लक्षात आली. तेव्हा त्यांनी ते वीज मीटर काढून घेतले व त्या घरातील वीज वापर कसा आहे याचा तपास सुरू केला, परंतु झालेला प्रकार वीज चोरी करणाऱ्या व्यक्तीस न आवडल्याने त्यांनी दमदाटी करून ते मीटर पुन्हा बसण्यास भाग पाडले. तसेच सर्व कर्मचारी यांना दमदाटी व जिवेठार मारण्याची धमकी देऊन शासकीय कामात अडथळा निर्माण केला.

> **नांदगाव भागातून तीन लोकांच्या वीज चोरी पकडण्यात आले आहेत. त्यांच्यावर कायदेशीर योग्य ती कार्यवाही करण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांना दमदाटी करणे हे प्रकार अयोग्य असून त्यांच्यावर रीतसर गुन्हा दाखल केला आहे.**
> **-कृष्णात सूर्यवंशी, उपकार्यकारी अभियंता, मुरूड महावितरण**

या प्रकरणी मुरूड महावितरण विभागाने पोलीस ठाण्यात रितसर तक्रार नोंदवताच समीर पठाण, शहजाद पठाण व अन्य अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सांगडे शाळेच्या इमारतीचे लोकार्पण



**चौक : प्रतिनिधी**


रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सांगडे येथे आपली बदली का झाली या प्रश्नाचे उत्तर शाळेला नवीन इमारत उभी करून दिली. यासाठी जेएसडब्ल्यू कंपनीचे मोलाचे सहकार्य लाभले, असे भावनिक उद्गार सांगडे शाळेचे मुख्याध्यापक धारणे यांनी काढले.

खालापूर तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा सांगडे ही तशी दुर्लक्षित आणि विद्यार्थी संख्या कमी. मग शाळेची आणि विद्यार्थी यांची प्रगती कशी होणार? असा प्रश्न डोक्यात ठेवून धरणे गुरुजी यांनी विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य निर्माण करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. जेएसडब्ल्यू जीबीएस फाऊंडेशन यांच्याशी संपर्क साधून शाळेची अवस्था सांगितली. त्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून जागाही अपुरी असल्याने जी प्लस वन अशी सुसज्ज, भव्य इमारत बांधून पूर्ण केली.

दरम्यानच्या काळात शाळेची अवस्था वाईट असल्याने विद्यार्थ्यांनी शेजारच्या गावच्या शाळेत प्रवेश घेतला. फक्त १८ विद्यार्थ्यांना घेऊन धारणे उभयतांनी शाळा प्रगतिपथाकडे घेऊन जाण्याचा चंग केला. त्यांनी जेएसडब्ल्यू जीबीएस फाऊंडेशन यांच्याशी संपर्क साधला आणि शाळेची हकीगत सांगितली.

डबल मजल्याची सुसज्ज इमारत बांधून तिचा लोकार्पण सोहळा पार पडला, हा आनंदाचा क्षण कोणीही विसरू शकत नाही, असे मुख्याध्यापक धरणे यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना प्रशस्त अशी शिकण्यासाठी जागा निर्माण झाली आहे. पाच वर्ष एकच वर्गात ५८ विद्यार्थी शिक्षण घेत होते. तरीदेखील विद्यार्थी गुणवत्ता कमी होऊ दिली नाही.

# आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर चौक येथे पोलिसांचा रूटमार्च



**चौक: प्रतिनिधी**

आगामी सण-उत्सवाच्या अनुषंगाने पोलिसांनी रूट मार्चचे आयोजन केले होते.मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर चौक बाजारपेठ परिसरात रूट मार्च काढण्यात आला. खालापूर पोलिस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा मार्च झाला.

येणाऱ्या काळात मोठ्या संख्येने पर्यटक या परीसरात येतात.खालापूर व परिसरात फार्महाउस, हॉटेल्स, ढाबे येथे पर्यटक यांची संख्या मोठी असते. चौक फाटा गजबजलेला असतो. सणाची मौजमजा लुटताना कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिस विभाग सज्ज झाला असून,खालापूर पोलिस निरीक्षक सचिन पवार, राखीव पोलिस निरीक्षक, अलिबाग रायगडचे एस. बाविस्कर, दंगा नियंत्रण पथकाचे तीन प्रशिक्षक,चौक दूर क्षेत्र प्रभारी विशाल पवार, पोलीस उप निरीक्षक शिवाजी जुंदरे यांच्या उपस्थित मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर चौक फाटा येथून तारापूर चौक बाजारपेठ असा रूट मार्च काढला.

# खालापुरातील क्षयरोगमुक्त ग्रामपंचायतींचा सन्मान

**चौक : प्रतिनिधी**

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यकमांतर्गत भारत सरकारने क्षयरोग मुक्त भारत करण्याकरिता २०२५ पर्यंत क्षयरोग उच्चाटनाचे नियोजन केलेले आहे. त्यानुसार खालापूर तालुक्यातील क्षयरोग मुक्त ग्राम पंचायत यांचा सन्मान करण्यात आला.

खालापूर तालुक्यात एकूण ४५ ग्राम पंचायत आहेत, त्यापैकी माणकीवली, होराळे, चीलठन, शिरवली, तुपगाव, टेंभरी, देव्हावे, जांभरुंग, चावणी, आत्करगाव, बीडखुर्द, हाळखुर्द, माडप, तांबाटी, जांभिवली, गोरठन, नारंगी, खरीवली, खानाव, वडवळ, लोधिवली, बोरगाव, वरोसे, वावर्ले,वावंढळ या ग्रामपंचायत यांचा सन्मान सहायक गटविकास अधिकारी कांबळे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. कल्याणी हिंगोले विस्तार अधिकारी शैलेंद्र तांडेल, चांदोरकर, पत्रकार अर्जुन कदम यांच्यासह ग्राम पंचायत अधिकारी, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, मदतनीस, शिक्षक उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सन २०२३ मध्ये क्षयरोग मुक्त ग्रामपंचायत हा अभिनव कार्यक्रम सुरू केला. खालापूर तालुक्यामध्ये सन २०२४ मध्ये २६ ग्रामपंचायतीचे नामांकन दावे आरोग्य विभागाला प्राप्त झाले होते. ७ ग्रामपंचायती रौप्य व १९ ग्रामपंचायतीचे कॅन्स पदक देण्यात आले. रौप्य पदक विजेते यांनी सातत्य राखले तर पुढच्या वर्षी सुवर्ण पदक प्राप्त होईल. सन्मानचिन्ह म्हणून महात्मा गांधीजी यांची प्रतिमा व जिल्हाधिकारी यांची सही असलेले सन्मान पत्र देण्यात आले.



# भाजप प्रत्येक तालुक्यात जनता दरबार घेणार -माजी आमदार पंडित पाटील



**मुरूड : प्रतिनिधी**

सर्व सामान्य नागरिकांच्या समस्या सुटल्या पाहिजेत. लोकांचे प्रश्न सुटले तर ते आपल्यासोबत जोडले जाणार आहेत.सर्वसामान्य नागरिक व लोकप्रतिनिधी यांचे नाते अबाधित राहिले पाहिजे. लोकांच्या मतावरच लोकप्रतिनिधी जनतेमधून निवडून येत असतात. दक्षिण भागातील भारतीय जनता पार्टी मजबूत करण्यासाठी प्रत्येक तालुक्यात भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून जनता दरबार घेऊन पक्ष मजबूत करणार असून यासाठी विविध मंत्र्यांचीसुद्धा मदत घेणार असल्याचे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे नेते व माजी आमदार पंडितशेठ पाटील यांनी केले आहे.

शीघ्रे येथे भाजप मधील सर्व कार्यकर्त्यांचा संवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता. या वेळी ते कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. या वेळी व्यासपीठावर भारतीय जनता पार्टीचे मुरुड तालुकाध्यक्ष शैलेश काते, जिल्हा कार्यकरणी सदस्य आण्णा कंधारे, मुरूड तालुका उपाध्यक्ष धर्माजी हिरवे, जिल्हा युवक नेते नंदेश यादव, माजी सरपंच रमेश दिवेकर, उमेश माळी, रमेश माळी, दीपक चोरडेकर, सरचिटणीस दीपक गीते, तालुका सरचिटणीस हरेश हरकशी, भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा अध्यक्ष नरेश वारगे, जिल्हा चिटणीस संघटक नरेश हिरवे, राजेश कर्जेकर, धर्मा पोटदुखे, भरत महादान, केशव म्हात्रे, सुरेश वाईकर, राजेश दिवेकर, सुरेश दिवेकर, नंदकुमार ठाकूर, महेंद्र दिवेकर, रामचंद्र लांबोरे, एम एम ठाकूर, विजय म्हात्रे, प्रकाश भोसतेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी माजी आमदार पंडित पाटील आपल्या भाषणात म्हणाले कि, कार्यकर्त्यांनी लोकांच्या संपर्कात राहून लोकांच्या समस्या नेते मंडळी पर्यंत पोहचून लोकांना न्याय मिळवून देण्याचे आवाहन सुद्धा पाटील यांनी केले. या वेळी असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

जिल्हा कार्यकरणी सदस्य आण्णा कंधारे व तालुका अध्यक्ष शैलेश काते यांनी सुद्धा आपले विचार व्यक्त केले. संवाद मेळाव्यास असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# नोडल अधिकारी प्रशिक्षण कार्यशाळा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतीच रेड रिबीन क्लबसंदर्भात आरआरसी नोडल अधिकारी जिल्हास्तरीय कार्यशाळा झाली.

या कार्यशाळेला प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे संचालक विक्रांत वार्डे लाभले. रायगड जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील रेड रिबीन क्लबचे नोडल अधिकारी आणि जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग येथील विविध पदाधिकारी यांनी उपस्थिती दर्शवली.

जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग येथील जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभागाचे संजय माने यांनी या कार्यशाळेसाठी उपस्थित असलेल्या सर्वांना मार्गदर्शन केले तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा.टी. पी. मोकल, विभागीय समन्वयक प्रा.डॉ. प्रवीण गायकवाड आणि प्रा.डॉ.दत्ता हिंगमिरे यांचेही मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या कार्यशाळेला जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग येथील रवींद्र कदम, संपदा मलेकर, रूपेश पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. निशिकांत कोळसे, क्रीडा अधिकारी प्रा.तेजेश म्हात्रे, प्रा.श्वेतल झिंजे, प्रा.कपिल जोशी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन पीएनपी कनिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी तसेच रेड रिबन क्लबचे नोडल अधिकारी प्रा. दिनेश पाटील यांनी केले.



# 'लग्नव्यवस्था अधिक सक्षम होणे गरजेचे'

**रोहा** : हिंदू संस्कृतीचा पाया असलेली लग्नव्यवस्था अधिक सक्षम होणे ही काळाची गरज असल्याचे मत अनुरूप विवाह संस्थेच्या संचालिका डॉ. गौरी कानिटकर यांनी ब्राह्मण मंडळ रोहा आयोजित श्री धावीर नाम सप्ताहात आयोजित प्रकट मुलाखतीत व्यक्त केले.

ब्राह्मण मंडळ रोहाच्या श्री धावीर नाम सप्ताहाचे यंदाचे १२५वे वर्ष असून त्यानिमित्ताने अनेक दर्जेदार कार्यक्रमांचे आयोजन श्री ओंकारेश्वर मंदिरात करण्यात आले आहे. या अनुषंगाने अनुरूप विवाह संस्थेच्या संचालिका डॉ. गौरी कानिटकर यांच्या लग्न बदलतंय या विषयावरील प्रकट मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. वक्त्या ॲड. पल्लवी दाते यांनी मुलाखत घेतली.

कार्यक्रमासाठी ब्राह्मण मंडळ रोहाचे अध्यक्ष अमित आठवले, सचिव निखिल दाते, सप्ताह प्रमुख महेश पेंडसे, उपाध्यक्ष सुहास फडके, खजिनदार उमेश जोशी, सदस्य प्रज्वल बापट, प्रतिक पाटणकर, स्वाती पेंडसे, स्मृती जोशी आदींनी परिश्रम घेतले.

# टीएमसी कॉलेजमध्ये नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत




**माणगाव : प्रतिनिधी**

जे.बी.सावंत एजुकेशन सोसायटीचे टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेज माणगाव येथे शुक्रवारी (दि.१८) शैक्षाणिक वर्ष २०२५-२६ करिता प्रथमवर्ष बीकॉममध्ये प्रवेश घेतलेल्या नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत संस्थेतर्फे केक कापून व पुष्प गुच्छ देऊन करण्यात आले.

या वेळी संस्थेचे सचिव नानासाहेब सावंत यांच्याहस्ते फित कापून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. नानासाहेब सावंत यांनी प्रथमवर्ष बीकॉममध्ये प्रवेश घेतलेल्या सर्व नवोदित विद्यार्थ्यांचे आपल्या मनोगतातून सुरवातीलाच संस्थेतर्फे स्वागत केले.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.अमृता देशमुख यांनी यावेळी आपल्या मार्गदर्शनात बोलताना सर्वप्रथम नवोदित विद्यार्थ्यांचे महाविद्यालयात स्वागत केले. शिवम काम्पुटर सेंटर माणगावचे संचालक भालचंद्र खाडे यांनी विविध संगणक कोर्सबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली.

या कार्यक्रमास संस्थेचे सदस्य रामदास पुराणिक, प्रा.अशोक मोरे, डॉ. नितीन मुटकुळे, प्रा.जगदीश शिगवण, ग्रंथपाल अमित बाकाडे, प्रा.भारत पवार, प्रा.सायगावकर, मुख्य लिपिक दिलीप ढेपे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृतीय वर्ष बीकॉमची विद्यार्थिनी अनिषा शिंदे यांनी करून प्रा.अशोक मोरे यांनी आभार मानले.

# वर्धापन दिन उत्साहात



































